**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com

**कृपया प्रसिध्दीसाठी -** **1 ऑगस्ट 2008**

## भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक व भाजपा मुंबईचे अध्यक्ष आमदार श्री.गोपाळ शेट्टी यांनी 1 ऑगस्ट 2008 रोजी मुंबई येथे संयुक्त पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

***"मुंबईच्या नव्या मतदार संघांच्या मतदार याद्यांना विलंब"- राम नाईक***

**मुंबई, शुक्रवार :** " निवडणूक आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे मुंबईतील नव्या मतदार संघांच्या मतदार याद्या 31 जुलै 2008 रोजी प्रसिध्द झाल्या नसून त्याला विलंब लागणार आहे. तसेच उत्तर मुंबई भाजपाने निवडणूक आयोगाला सादर केलेल्या तीन लाख 80 हजार दुबार (डुप्लीकेट) मतदारांच्या याद्या तपासण्याचे कामही निवडणूक आयोगाने आश्वासन देऊनही अद्याप पूर्ण झाले नाही. ही बाब आगामी लोकसभा निवडणूकीच्यादृष्टीने अतिशय गंभीर आहे," असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक व भाजपा मुंबईचे अध्यक्ष आमदार श्री.गोपाळ शेट्टी यांनी केले आहे. ते आज मुंबईत संयुक्त पत्रकार परिषदेत बोलत होते.

यासंबंधी अधिक माहिती देतांना श्री.राम नाईक आणि श्री.गोपाळ शेट्टी म्हणाले, "2004 च्या गेल्या लोकसभा निवडणूकीच्या वेळी मतदार याद्यामध्ये प्रचंड गोंधळ झाला होता. हजारो मतदारांची नावे मतदार याद्यातून नाहीशी झाली होती तर अनेकांना त्यांची मतदानकेंद्रेच सापडली नव्हती. आगामी निवडणुकीत तसा गोंधळ होऊ नये आणि मतदार याद्या निर्दोष व्हाव्यात म्हणून उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील बोरीवली, कांदिवली आणि मालाड या तीन विधानसभा क्षेत्रातील मतदारांच्या नावांची मुंबईतील 34 आणि ठाणे लोकसभा मतदार संघातील सहा म्हणजेच एकूण 40 विधानसभा मतदार याद्यांशी पडताळणी केली असता 18,02,877 मतदारांपैकी 3,80,461 नावे (21 टक्के) दुबार (डुप्लीकेट) असल्याचे निदर्शनास आले. या सर्व नावांचे 10,671 कागद 29 एप्रिल व 31 मे 2008 रोजी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री.देवाशिष चक्रवर्ती यांना देण्यात येऊन मतदार याद्या तपासून घेण्याची विनंती करण्यात आली होती."



निवास : बी-503, लक्षचंडी अपार्टमेंट, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, कृष्णवाटिका रास्ता, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063 • दूरभाष : 022-2841 33 99, फैक्स : 022-2842 33 99

**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com



"ही सर्व माहिती दिल्लीतील निवडणूक आयोगालाही देण्यात आली, इतकेच नव्हे तर भाजपाच्या शिष्टमंडळाने 10 जून रोजी मुख्य निवडणूक आयुक्त श्री.एन्.गोपालस्वामी आणि निवडणूक आयुक्त डॉ.एस्.वाय.कुरेशी यांच्याशी दिल्लीत सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती पुनर्गठित नव्या मतदारसंघांच्या याद्या 31 जुलै रोजी प्रकाशित करण्यात येतील आणि त्यापूर्वी दुबार मतदार याद्यांतील मतदारांची तपासणी घरोघरी जाऊन करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते," असे श्री.नाईक आणि श्री.शेट्टी यांनी सांगितले.

बुधवार, 30 जुलै रोजी नव्या मतदार याद्या केव्हां मिळणार, दुबार नावांची तपासणी पूर्ण झाली का याची माहिती घेण्यासाठी श्री.राम नाईक आणि श्री.गोपाळ शेट्टी यांनी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी आणि मतदार नोंदणी अधिकारी श्री.विश्वास पाटील यांची भाजपाच्या शिष्टमंडळासह भेट घेतली. तेव्हां मतदार याद्या 31 जुलै रोजी उपलब्ध होऊ शकणार नाहीत, त्यासाठी अधिक वेळ लागेल असे त्यांनी सांगितले. तसेच दुबार मतदारांची यादी घरोघर जाऊन तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिका-यांच्याकडून अद्याप आलीच नाही असेही त्यांनी सांगितले. "हे ऐकल्यावर आम्हाला धक्काच बसला. या प्रकरणी आम्ही तातडीने मुख्य निर्वाचन आयुक्तांना कळविले असून उपनगर जिल्ह्याच्या याद्या निर्दोष असल्या पाहिजेत, दुबार नावांची तपासणी केली पाहिजे तसेच याद्या प्रसिध्द होण्यास अधिक विलंब लावू नये अशी मागणी केली आहे," असे श्री.नाईक आणि श्री.शेट्टी म्हणाले..

मुंबई उपनगर जिल्हाधिका-यांना भेटण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात श्री.राम नाईक आणि श्री.गोपाळ शेट्टी यांच्याशिवाय भाजपा मुंबईचे उपाध्यक्ष श्री.जयप्रकाश ठाकूर, मुंबई उत्तर-पश्चिम जिल्ह्याचे अध्यक्ष श्री.सुमंत घैसास, उत्तर मुंबई जिल्ह्याचे सरचिटणीसव्दय ॲड्.जयप्रकाश मिश्र आणि श्री.जगदीश पटेल, तसेच चिटणीस श्री.विनोद शेलार यांचा समावेश होता.

(कार्यालय मंत्री)

निवास : बी-503, लक्षचंडी अपार्टमेंट, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, कृष्णवाटिका रास्ता, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063 • दूरभाष : 022-2841 33 99, फैक्स : 022-2842 33 99